## 'बनगरवाडी'चे तटस्थ चित्रीकरण

चित्रभाषेचा योग्य वापर करून कादंबरी पडद्यावर यथार्थपणे उतरवण्याचा बराचसा यशस्वी प्रयत्न अमोल पालेकर यांनी 'बनगरवाडी'च्या निमित्ताने केला आहे. वातावरण आणि व्यक्तिरेखा ही या कादंबरीची बलस्थाने आहेत आणि चित्रपटात ती तशीच कायम राहिली आहेत. कारभारी, मास्तर, अंजी, शेकोबा, शेकूची बायको, आनंदा, आयबू, दादू, ब्रालट्या आणि अगदी आगमनापुरतेच दिसणारे पंत सरकारसुद्धा आपापल्या वैशिष्ट्याने चमकून उठतात. मास्तराच्या व्यक्तिरेखेत चंद्रकांत कुलकर्णी एवढे चपखल बसले आहेत की त्यांच्या निवडीतच अर्धी बाजी जिंकली आहे. नंदू माधव याने सादर केलेला आनंदा तर अविस्मरणीय. अंजीच्या भूमिकेसाठी केलेली अधिश्री अत्रेची निवडही अगदी सार्थ आहे. कादंबरीतील अंजी थोडी निराळी आहे. ती शेकूबरोबर न राहता दुसऱ्याच बरोबर पळून जाते. एका स्वच्छंदी मुक्त स्वभावाचे दर्शन देणारी कादंबरीतील अंजी चित्रपटात शेकूशी एकनिष्ट दाखवून काय साध्य केले, कळले नाही. दादू, बालट्या, सुनील रानडे यांचा 'आयबू तसेच गणेश यादव यांचा जगन्यासुद्धा लक्षात राहतो. या चित्रपटाची पटकथाही एकमार्गीच आहे. पण त्यात कुठे दाखवेगिरी नाही. चित्रपटाला स्वाभाविक आणि आवश्यक तेवढी गती आहे.

कारभाऱ्याचे मरण, पंत सरकारचे आगमन, जगन्याचा पाठलाग हे प्रसंग प्रभावी झाले आहेत. शाळेची घंटा वाजवणारी पोरे तर बेफाटच. देबू देवधर

# 'बनगरवाडी' साक्षात डोळ्यासमोर उभी राहिली!

■ पान १ वरून

परिणामकारकतेत आणखी भर घातली आहे ती वनराज भाटिया यांच्या पार्श्वसंगीताने. परंतु काही दृश्यांच्या वेळी अचानक येणारे कटस् काहीसे खटकतात.

'दोघी'च्या सुमित्रा भावे आणि सुनील सुकथनकर यांची वार्ताहर परिषद आज झाली. आपली संपूर्ण 'टीम' कशी बांधिलकी मानणारी आहे ते त्यांनी सांगितलं. चित्रपटाइतकाच चित्रपट बनवण्याचा भागही आपण महत्त्वाचा मानत असल्याचं सांगून सुमित्रा भावेंनी चित्रपट बनवताना त्यात स्थानिक लोकांना आपण कसे गुंतवत जातो तेही सांगितलं. 'स्ट्राँग इमोशनॅलिटी'मुळे 'दोघी' खेड्यातील लोकांनाही आवडेल, अशी आशा त्यांनी व्यक्त केली.

जागतिक सिनेमा विभागात काल सर्वांचं आकर्षण ठरली होती, एक लहान मुलगी. 'अमेरिकन डॉटर' या चित्रपटात तिची प्रमुख भूमिका होती. आपल्या सहज अभिनयाने तिने प्रेक्षकांवर चांगलीच छाप पाडली. विशेष म्हणजे चित्रपटाच्या वेळी हजर होती आणि चित्रपट संपल्यावर तिचं कौतुक करायला तिच्याभोवती अनेक प्रेक्षकांचा गराडाच पडला.

आपल्या मुलीसह रशिया सोडून ॲलेक्सी अमेरिकेत येऊन स्थायिक झाली आहे. तिने एका श्रीमंत माणसाशी लग्न केलंय आणि मुलीला तिचा खरा बाप मेलाय असं सांगितलंय. एक बाप मुलीला रशियात घेऊन जायला येतो. पण ॲलेक्सी त्याला नकार देते. बापाच्या प्रेमात पडलेली मुलगी त्याच्याकडे येते आणि 'मेक्सिकोतून रशियात पळून जाऊया' म्हणून त्याला सांगते. दोघे वाटेत पकडले जातात आणि बापाला चार वर्षं तुरुंगवासाची शिक्षा होते. परंतु एक दिवस मुलगी चक्क आपल्या अमेरिकन बापाचं हेलिकॉप्टर घेऊन तुरुंगाच्या आवारात येते आणि खऱ्या बापाची सुटका करते.

विशेष म्हणजे बापाला इंग्रजी येत नसतं आणि मुलीला रशियन येत नसतं. परंतु तरीही त्यातून त्यांचा जो संवाद उभा राहतो तो दिग्दर्शकाने छान टिपला आहे. चित्रपट तर सुंदर आहेच, पण त्याच्या परिणामकारकतेत सर्वात मोठा वाटा आहे, तो त्या मुलीच्या अभिनयाचा.

बेल्जियमच्या 'मानेकन पिस'मध्ये एक प्रेमकथा दाखवण्यात आली. पण अत्यंत सामान्य हाताळणीमुळे चित्रपटात विशेष काहीच नव्हतं. रिट्रोस्पेक्टिव्हमधे ऑर्सन वेल्सने अभिनय केलेला 'क्रॅक इन द मिरर' हा चित्रपट दाखवण्यात आला. प्रियकर आणि प्रेयसी मिळून तिच्या जुन्या प्रियकराचा खून करतात. ही केस चालवणारे दोन वकील काहीसे त्याच अवस्थेतून जात असतात. कारण एका वकिलाची प्रेयसी आता दुसऱ्या वकिलाच्या प्रेमात पडलेली असते. चित्रपटाच्या या गुंतागुंतीच्या कथानकात गंमत आणण्याकरता दिग्दर्शकाने आणखीही एक छान क्लृप्ती वापरली आहे. तीन कलाकार पहिल्या तीन भूमिका करतात आणि तेच तीन कलाकार वकील तसंच त्यांच्या प्रेयसीची भूमिका करतात. काहीशा वेगळ्या प्रकारच्या या गुन्हेगारी कथेलाही प्रेक्षकांनी चांगला प्रतिसाद दिला.

# 'बनगरवाडी' साक्षात डोळ्यासमोर उभी राहिली!

दिल्ली प्रतिनिधी

व्यंकटेश माडगूळकर यांच्या गेली अनेक वर्षं गाजत असलेल्या 'बनगरवाडी' या अभिजात साहित्यकृतीमधे दिसणारी माणदेशी निरागस माणसं आणि दूरवर पसरलेला माणदेशाचा ओकाबोका प्रदेश यांचं यथार्थ दर्शन अमोल पालेकर दिग्दर्शित 'बनगरवाडी' या चित्रपटात दिसतं. कादंबरीशी जास्तीत जास्त प्रामाणिक राहून आशय प्रभावीपणे मांडण्यात पालेकर यांच्या दिग्दर्शनाचा वाटा जेवढा आहे, तेवढाच छायाचित्रकार डेबू देवधर यांचाही. सिनेमास्कोपमुळे 'बनगरवाडी' साक्षात डोळ्यासमोर उभी राहते.

काल इंडियन पॅनोरमात 'बनगरवाडी'चा पहिला खेळ झाला. त्याला पत्रकार आणि प्रतिनिधींसह विशेष आमंत्रित मोठ्या संख्येने हजर होते. या सर्वांनी चित्रपटाला दिलेला प्रतिसाद उत्साहवर्धक होता. प्रमुख भूमिकेतील चंद्रकांत कुलकर्णी यांच्याबरोबरच अभिनयाचा विशेष उल्लेख करायला हवा तो नंदू माधव आणि सुनील रानडे यांचा. चित्रपटाच्या

पान ३ वर ■

